## एम . बी . मोरे महीला महाविदयालयात पदवीदान समारंभ संपन्न

एम . बी : मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविदयालयात आज मंगळवार दि . २८ जानेवारी २०२० रोजी शैक्षणिक वर्ष २०१८ १९ मध्ये मुंबई विदयापीठाच्या तृतीय वर्षात उत्त्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यीनींचा पदवीदान समारंभ पार पडला . कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतून उत्त्तीर्ण झालेल्या एकूण ५३ विदयार्थ्यीनींना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले . कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे मा . श्री . डॉ . यशवंतराव माने उपविभागीय दंडाधिकारी रोहा यांनी विदयार्थ्यीनींना मार्गदर्शन करताना आजच्या सोशल मिडीयाचा अतिवापर आणि त्यामुळे होणारा वेळेचा अपव्यय टाळण्यास सुचविले . तसेच मा . श्री . किरणकुमार सुर्यवंशी उपविभागीय पोलीस अधिकारी यांनीदेखील विदयार्थ्यीनींना स्पर्धापरिक्षेबाबत मार्गदर्शन केले आणि नोकरीपेक्षा व्यवसायाला प्राधान्य देण्यास सांगितले .

या कार्यक्रमाला मा . श्री . विजयराव मोरे मा . श्री . विनोदभाउ पाशिलकर मा . सौ . कल्पिता साळुंखे मा . श्री . शशिकांत मोर तसेच महीला महाविदयालयाच्या परिक्षा विभाग प्रमुख प्रा . माधुरी जाधव आणि सहकारी प्रा . प्रतिक्षा घारगे प्राचार्य श्री . प्रसन्न म्हसळकर आणि सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते .